# कला, वाणीज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी जि. वर्धा

**इतिहास विभागा तर्फे करण्यात आलेला**
**क्षेत्र अभ्यास प्रकल्प (फिल्ड प्रोजेक्ट)**
**(सत्र 2020-2021)**

## मनसर उत्खन्नाचे ऐतहासिक महत्व



*** इतिहास विभाग ***

**कला, वाणीज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी जि. वर्धा**

# कला, वाणीज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी जि. वर्धा

## क्षेत्र अभ्यासाचे प्रकल्प (फिल्ड प्रोजेक्ट) चे कार्यकारी सदस्य


## प्रा. डॉ. दीपक मनीराम चव्हाण

(सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख)


## कला, वाणीज्य व विज्ञान महाविद्यालय इतिहास अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य

## फिल्ड प्रोजेक्टमधील सहभागी विध्यार्थीची  नावे -

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | वर्ग |
|---|---|---|
| 1. | हेमंत हिवराळे | बी.ए. तृतीय वर्ष |
| 2. | कु. समिक्षा निखाडे | बी.ए. तृतीय वर्ष |
| 3. | कु. चेतना बिहारी | बी.ए. तृतीय वर्ष |
| 4. | कु. त्रिवेणी ईखार | बी.ए. तृतीय वर्ष |
| 5. | राहुल शाल | बी.ए. तृतीय वर्ष |
| 6. | गौरव वसुले | बी.ए. तृतीय वर्ष |
| 7. | प्रिशक बन्सोड | बी.ए. तृतीय वर्ष |
| 8. | भुषण मंडवे | बी.ए. तृतीय वर्ष |
| 9. | अक्षय सुरजुसे | बी.ए. तृतीय वर्ष |
| 10. | चेतन कडु | बी.ए. तृतीय वर्ष |
| 11. | रेहान शेख | बी.ए.तृतीय वर्ष |
| 12. | कु. शिवानी हरणखेडे | बी.ए.द्वितीय वर्ष |
| 13. | कु. गायत्री लांडगे | बी.ए.द्वितीय वर्ष |
| 14. | कु. काजल खोडे | बी.ए.द्वितीय वर्ष |
| 15. | कु. हर्षिता त्रिवेदी | बी.ए.द्वितीय वर्ष |

प्रस्तावना -

जीवन जगतांना इतिहास उपयुक्त आहे. इतिहासामुळे ज्ञानात वृद्धी होते. इतिहास हा विषय नैतीक व सामाजीक मूल्याची प्रितष्ठापना करणारा, प्रेरणादायी व तत्वबोध होणारा आहे. इतिहासामुळे देशभक्ती, देशप्रेम आणि राष्ट्रिनष्ठेसारखे मुल्य जोपासले जाते. इतिहास तरुण युवकांना मार्गदर्शक ठरु शकतो. या विषयातुन विद्यार्थ्यांना पर्यटन क्षेत्राचा अभ्यास होवून रोजगार सुद्धा निर्माण होवू शकतो. या उद्देशानेच कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आर्वी येथील इतिहास विभागाच्यावतीने सत्र 2020-21 या शैक्षिणक क्षेत्रात विद्यार्थ्यामध्ये इतिहास विषयाची अभिरुची विकसीत व्हावी व त्यांना विदर्भातील एैतिहासिक स्थळाविषयी माहिती व्हावी, इतिहासाबद्दल आपली मत व्यक्त करता यावी या उद्देशाने इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने क्षेत्रीय प्रकल्प (फिल्ड प्रोजेक्ट) ही योजना राबिवण्यात आली होती.

मनसर येथील उत्खन्नाला भेट देवून तेथील वैशिष्टयेपूर्ण वाकाटककालीन कला कृतीचे दर्शन विद्यार्थ्यांना घडिवण्यात आले. मागील अनेक वर्षापासून मनसर येथे इतिहासकार डॉ. शर्मा यांच्या नेतृत्वाखाली उत्खन्नन सुरु आहे. या उत्खन्नामध्ये वाकाटकांचा गौरवशाली इतिहास प्राप्त झाला आहे. मनसर भेट ही इतिहासप्रेमीसाठी एक प्रर्वनीच आहे.

भौगोलीक स्थान -

मनसर हे ठिकाण भारताचे माईल-स्टोन असलेल्या नागपूरच्या उत्तरेला असून नागपूर पासून 40 कि.मी. अंतरावर आहे. जवळच रामटेक आणि निसर्ग सौंदर्याने नटलेला खिंडसी तलाव आहे. मनसरला गेल्यानंतर जवळच टेकडीवर

वाकाटककालीन उत्खन्नन आढळून आली. हे उत्खन्नन इतिहासप्रेमींना आकिर्षत करणारे होते. या उत्खन्ननाचे अभ्यास करण्याचा मानस आमच्या इतिहास अभ्यासमंडळाने केला.

एैितहािसक पाश्र्वभूमी -

िततसऱ्या ते सहाव्या शतकात दिक्षणेत ज्या वंशानी राज्य केले त्यात आदराचे स्थान अितशय भरभराटीला आलेल्या व उच्च संस्कृती लाभलेल्या वाकाटक वंशाला दयावा लागेल. वाकाटक वंश हे गुप्त वंशाचे समकालीन होते. उत्तरेतील प्रबळ अशा गुप्तांच्या काळातच दिक्षणेत नर्मदा ते गोदावरी दरम्यान वाकाटकांची सत्ता पसरलेली होती. ईसवी सन 1836 मध्ये वाकाटकांचा ताम्रपट शिवनी येथे िमळाला. त्यानंतर डॉ. िमराशीनी यांनी संशोधन करुन, "वाकाटक नृप्ती व त्यांचा काळ' हे पुस्तक िलहीले. त्यानंतर मनसर येथील उत्खन्नातून वाकाटकाविषयी बरीच माहीती िमळण्याची शक्यता आहे.

हे उत्खन्नन जवळपास चार एकर एवढया परिसरामध्ये असून त्यामध्ये वाकाटककालीन अवशेष आढळून आलेले आहे. यावरुन वाकाटकांचा काळ हा वैभवाचा कालखंड होता असे दिसून येते.

वाकाटक वंशाचा संस्थापक विंधशक्ती -

अंिजठा िशलालेखामध्ये विंध शक्तीिवषयी भरपूर स्तुती केलेली आहे. ईसवी सन 280 पूर्वी िवंध शक्तीने वाकाटक साम्राज्याचा पाया घातला त्याला, "वाकाटक वंश केतू' असे म्हटले आहे. वाकाटक वैदीक धर्मीय होते. त्यांनी आपले सार्वभौमत्व िसद्ध करण्यासाठी अश्वमेघ यज्ञ केले. हे यज्ञ सार्वभौम सत्तेचे प्रतीक आहे.

ईसवी सन 1928 मध्ये रेल्वेचे काम सुरु असतांना मनसर या िठकाणी काही ताम्रपट आढळून आले. या ताम्रपटाचा सखोल अभ्यास करुन

**इितहास संशोधक**

डॉ. शर्मा यांनी देवटेक येथील सम्राट अशोकांचा िशलालेखाचा अभ्यास करुन त्यांनी मनसर येथे उत्खन्नाला सुरुवात केली आिण आश्चर्य म्हणजे मातीच्या िढगाऱ्यात गढलेले एैितहािसक बुड उकलले गेले. 1997-98 या कालखंडापासून आजपर्यंत तेथे उत्खनन सुरुच आहे. या उत्खननामध्ये अश्मयुगीन अवजारे, तर वाकाटककालीन वास्तुिशल्प आढळून आले. शुंगकालीन िशक्के, भांडे तेथे आढळून आले आहे. या उत्खननावरुन वाकाटकांनी सात वाहनांचा पराभव करुन दक्षीणेत स्वतःची प्रबळ सत्ता िनर्माण केली.

प्रवरसेन पिहला (ई.स. 280 ते 340) -

वाकाटक वंशातील पराक्रमी राजा प्रवरसेन पिहला होवून गेला. त्याने शकावर विजय िमळवून उत्तर महाराष्ट्र जिंकून घेतला. त्याने नाग घराण्याशी वैवािहक संबंध जोडले. िवदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, छत्तीसगढ, माळवा व दिक्षण कौसल असे विशाल साम्राज्य िनर्माण केले होते.

रुद्रसेन दुसरा (ई.स. 390 ते 395) -

प्रवरसेन पिहल्यानंतर या घराण्यात रुद्रसेन दुसरा हा पराक्रमी राजा होवून गेला. तो चंद्रगुप्त िवक्रमािदत्याचा समकालीन होता. िवक्रमािदत्याने आपली मुलगी प्रभावती गुप्ताचा िववाह रुद्रसेन दुसऱ्याशी लावून दिला होता. रुद्रसेनाच्या मृत्यूनंतर दुसरा प्रवरसेन (ईसवी सन 410 ते 445) गादीवर बसला. त्याची राजधानी नंदीवर्धन होती. त्याने प्रवरपुर नावाचे शहर बसिवले. वाकाटकांची

दुसरी शाखा वत्सगुल्म (वािशम) येथे सर्वसेनने स्थापन केली. ईसवी सन 563 मध्ये बस्तरच्या नलराजाने वाकाटकावर आक्रमण करुन राजधानी गाढून टाकली होती.

उत्खननातून प्रगट झालेला वाकाटकांचा इितहास -

इितहास संशोधक डॉ. शर्मा यांच्या मते दुसऱ्या प्रवरसेनाची राजधानी प्रवरपुर म्हणजे आजचे मनसर होय. त्याने आपल्या िपत्याच्या स्मरणार्थ हे शहर वसिवले. मनसर येथील उत्खननामध्ये बारा ज्योिर्तलिंग आढळून आले. वाकाटक राजे िशवभक्त असल्याने मानसरोवर येथील बारा ज्योिर्तलिंग मनसरला आणता आले नाही. त्यामुळे त्यांनी मानसरोवराची प्रतीकृती त्यांनी येथेच तयार केली. म्हणून या शहराचे नाव मनसर असे पडले. हे िशवलिंग Δ या आकाराचे आहे. हा ित्रकोणशक्ती व िशवाचे प्रतीक होय असे िशवलिंग Δ त्यांनी तयार करुन त्यामध्ये बारा ज्योिर्तलिंगाची स्थापना केली. आधुिनक युगामध्ये हे िशवलिंग Δ कुटूंबिनयोजनाचे प्रतीक आहे. त्यावरुन त्या युगामध्ये वाकाटक राजे िकती दुरदृष्टीचे होते हे दिसुन येते.

1928 ला डॉ. िमराशिंना यांना शिवनी येथे िमळालेला ताम्रपट आणि मनसर येथे िमळालेला ताम्रपट हा िमळताजुळता आहे. त्यावर जी पेन्टींग आहे ती अजिंठयाचा पेन्टींगशी िमळतीजुळती आहे. यावरुन असा िनष्कर्ष िनघतो की, अजिंठा पेन्टींगमध्ये वाकाटकांचे मोठे योगदान होते.



वाकाटककालीन व्यवस्था -

ई.स. 563 मध्ये बस्तरच्या नलराजाने वाकाटकावर आक्रमण करुन राजधानी जाळून टाकली. तेव्हा नरेंद्र सेनाने भंडारा जिल्हयातील आमगांव येथे दुसरी राजधानी निर्माण करुन आपला कारभार सुरु केला. त्याने राजधानी प्रवरपुर पुन्हा जिंकुन घेतले व जवळच नगरधन नावाची नविन राजधानी वसिवली. प्रवरपुरच्या महालाचे रुपांतर पुढे विहारात करण्यात आले. हे विहार उत्खननात जसेच्या तसे आढळून आलेले आहे. या किल्याची रचना सरंक्षणात्मक होती. चारही बाजुला तटबंधी असून किल्याला उत्तर आणि पश्चिम असे भव्य दरवाजे होते. किल्याच्या उत्तरेला प्रचंड मोठा तलाव होता. तलावाच्या किनाऱ्यावरच हा किल्ला वसलेला आहे. त्याचा परीघ सुमारे 4 कि.मी. एवढा आहे.

िकयामध्ये पूर्व-पश्िचम अश्या गुप्त रस्त्याची व्यवस्था आहे. िकल्याच्या पश्िचमेला ध्यानसाधनाची व्यवस्था दिसून येते. मानसरोवरातून िकल्याला पाणी पुरवठा होत असावा असे दिसून येते. िकल्यातून सांडपाणी वाहुन नेण्यासाठी पश्िचमेला उत्तम व्यवस्था दिसुन येते. िकल्याच्या उत्तरेला दहा छोटया खोल्या आढळतात. तेथे बौद्ध िभक्षू राहत असावे. उत्खननामध्ये जे अवशेष प्राप्त झाले ते सर्व, "बोधीसत्व मंजुश्री महािवहार मनसर' येथे ठेवण्यात आले आहे.

रामटेक -

मनसर जवळ दीड िक.मी. अंतरावर रामटेक हे गांव आहे. रामटेक हे शहर प्रभावती गुप्तांनी वसिवले आहे असे उत्खन्नातील ताम्रपटावरुन िसद्ध होते. प्रभावती गुप्ता रामभक्त असल्याने तीने रामटेक येथील मेघगिरीवर राम िसतेचे मंदीर बांधले. बाजुला िवशाल असे वराह मंदीर आढळून येते. पुढे या मंदीराची डागडुजी नागपुरकर भोसल्यांनी केल्याचा उल्लेख मिळतो.




कालीदास स्मारक -

रामटेकच्या बाजुला सुंदर असे कालीदास स्मारक तयार करण्यात आले आहे. प्रभावती गुप्ताने राज्यकारभार हातात घेतल्यानंतर चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या मदतीसाठी विद्वान, लेखक कालीदासाला दक्षिण भारतात पाठिवले. कारण कालीदासाने वाकाटक राज्याची उत्तम व्यवस्था लावली होती. याच कालीदासाने मेघिगरी पर्वतावर बसून जगप्रिसद्ध "मेघदुत' हे महाकाव्य लिहीले ते जगात अजरामर आहे.



निष्कर्ष

**मनसरचा पर्यटन स्थळ म्हणुन विकास होणे आवश्यक आहे**

प्राचीन काळात संपुर्ण भारतात गुप्त सम्राटांनी सुवर्णयुग निर्माण केले होते. त्याच काळात वाकाटकांनी स्वतःच्या पराक्रमाने दक्षिणेत सुवर्णयुगाची पार्श्वभूमी निर्माण केली होती. आज हा कालखंड इतिहासाला पुन्हा ज्ञात झाला. मनसर येथील स्थळाला पुरेपूर मदत देवून महाराष्ट्र सरकारने ते पर्यटन क्षेत्र म्हणून घोषीत करावे. त्याचा विकास करुन येथे गर्दी होईल व विदेशी चलन वाढण्यास मदत होईल. मात्र पर्यटनाबाबत भारत सरकार उदासीन असल्याचे दिसून येते. उत्खननामध्ये मिळालेल्या कलाकृतीची निगा भारतीय पुरातत्व विभागाने राखल्यास हा अमूल्य ठेवा अनेक दिवस टिकेल.